**कुष्ठरुग्णांसाठी कार्य करणाऱ्या महारोगी सेवा समिती, आनंदवन, वरोरा जि.चंद्रपूर या स्वयंसेवी संस्थेस रु.१० कोटी कॉर्पस फंड वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः कुनिका-१२२५/प्र.क्र.६१/संसआ - २**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, १० वा मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
दिनांक: १५ मे, २०२६.

वाचा :-

१) कुष्ठरुग्णांसाठी कार्य करणाऱ्या महारोगी सेवा समिती, आनंदवन, वरोरा जि.चंद्रपूर या स्वयंसेवी संस्थेस कॉर्पस फंड देण्यासंदर्भातील मा.मुख्यमंत्री महोदयांची आनंदवन, चंद्रपूर येथे दि.०९.०२.२०२५ रोजी केलेली घोषणा.
२) सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे-६ यांचे पत्र क्र.ससंआसे/कुष्ठवक्षय/अनुदानशाखा/आनंदवनवरोराचंद्रपूर/न.क्र.११५/६८/२६, दि.०५.०१.२०२६
३) मा.मंत्रिमंडळाच्या दि.२२.०२.२०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णय.
४) शासन निर्णय समक्रमांकित दि.११.०३.२०२६
५) सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे-६ यांचे पत्र क्र.ससंआसे/कुष्ठवक्षय/अनुदानशाखा/कॉर्पसफंड/आनंदवनवरोराचंद्रपूर/५४३४-४०/२६, दि.२०.०४.२०२६

प्रस्तावना :-

महारोगी सेवा समिती, आनंदवन, वरोरा जि.चंद्रपूर या कुष्ठरोग्यांची सेवा करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.०९.०२.२०२५ रोजी भेट दिली असता, सदर स्वयंसेवी संस्थेस रु.१० कोटी कॉर्पस फंड देण्याबाबत घोषणा केली होती. स्वयंसेवी संस्थांना कॉर्पस फंड उपलब्ध करून देण्याबाबत शासनाचे विवक्षित असे कोणतेही धोरण नसल्याने व सदर बाब धोरणात्मक स्वरूपाची असल्याने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या घोषणेच्या अनुषंगाने व महारोगी सेवा समिती, आनंदवन, वरोरा जि.चंद्रपूर या स्वयंसेवी संस्थेकडून कुष्ठरुग्णांसाठी प्रदीर्घ काळ करण्यात येत असलेले कार्य विचारात घेऊन या स्वयंसेवी संस्थेस एकवेळची विशेष बाब म्हणून रु.१० कोटी कॉर्पस फंड देण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या निर्णयार्थ सादर करण्यात आला. मा.मंत्रिमंडळाने दि.२२.०२.२०२६ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महारोगी सेवा समिती, आनंदवन, वरोरा जि.चंद्रपूर या स्वयंसेवी संस्थेस रु.१० कोटी कॉर्पस फंड एक वेळची विशेष बाब म्हणून मंजूर करण्यास संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महारोगी सेवा समिती, आनंदवन, वरोरा जि.चंद्रपूर या कुष्ठरोग्यांची सेवा करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस रुपये १० कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-:

सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे यांनी संदर्भ क्र. ५ येथील दि.२०.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने व वित्त विभागाच्या दिलेल्या मंजूरीनुसार महारोगी सेवा

समिती, आनंदवन, वरोरा जि.चंद्रपूर या कुष्ठरोग्यांची सेवा करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णय, दिनांक ११.०३.२०२६ मध्ये निश्चित केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्याच्या अटीच्या अधीन राहून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये कुष्ठरोग मुक्त झालेल्या रोग्यांना पुनर्वसनासाठी अनुदाने (कार्यक्रम) २२१० ०७४५ या लेखाशिर्षांतर्गत ५०-इतर खर्च या उद्दिष्टाखाली रु.१०,००,००,०००/- (रुपये दहा कोटी फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग), चंद्रपूर यांना आहरण व संवितरण अधिकारी व सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या नोट क्र.९८ ते १०४, ई-नस्ती क्र.१३४७२१३, दि.२८.०४.२०२६ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र.२०२६०५१५११४३५६९८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ASHOK SAUNDAJI KAYANDE

Digitally signed by ASHOK SAUNDAJI KAYANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=E8A148F20AC4452CCA38F82A2D8DA98A25BCD6C0593B3C922FB9350133146D2A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=05AA2DA5646942EDAA700CF0373625004877939054FDE4112AEA5CFDF5E9236D, cn=ASHOK SAUNDAJI KAYANDE
Date: 2026.05.15 13:00:11 +05'30'

**(अशोक कायंदे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१ /२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर.
२) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३) संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई.
४) संचालक, आरोग्य सेवा (प्राथमिक), पुणे.
५) सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे.
६) सहसंचालक आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
७) अवर सचिव, वित्त विभाग (व्यय-१३ / अर्थ-९), मंत्रालय, मुंबई.
८) अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग), चंद्रपूर.
११) जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर.
१२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४) सचिव व मुख्य कार्यकारी, महारोगी सेवा समिती, आनंदवन, वरोरा जि.चंद्रपूर
१५) सर्व कार्यासने, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवडनस्ती (संसर्गजन्य आजार-२)